## Quadrant II – Transcript and Related Materials

**Programme: Bachelor of Arts ( First Year)**

**Subject: Marathi**

**Paper Code:MRG 102**

**Paper Title: प्रसारमाध्यमासाठी लेखनकला कौशल्य : बातमीलेखन**

**Unit: 2 मुद्रित, दृक-श्राव्य आणि आकाशवाणी या माध्यमातील बातमीचे स्वर**

**Module Name: आकाशवाणीवरील बातमीपत्र**

**Module No : 7**

**Name of the Presenter: DR. Jayprabhu Shamrao Kamble, Assistant Professor, Marathi Department, Government College of Arts, Science and Commerce Quepem.**

### Transcript : आकाशवाणीवरील बातमीपत्र

**१.प्रस्तावना**

ज्या माध्यमावरून प्रसारित होणारा भाग केवळ ऐकता येतो, त्या माध्यमाला श्राव्य माध्यम म्हणतात.

श्राव्य माध्यमांमध्ये आकाशवाणीचा समावेश होतो. आकाशवाणीवरून सादर केली जाणारी बातमीपत्रे ही मोठ्या प्रमाणात ऐकली जातात.

त्यामुळे आकाशवाणी हे श्राव्य माध्यम सर्वांत गतीशील माध्यम म्हणून ओळखले जाते.

बातमीदार, पत्रकार परिषदा, इंटरनेट, पीटीआय, युएनआय ही आकाशवाणीवरील बातम्यांचे प्रमुख स्त्रोत आहेत.

**२.आकाशवाणीवरील बातमीचा रचनाबंध**

रचनाबंध म्हणजे मांडणी होय. आकाशवाणीवरील बातमीपत्राचा कालावधी हा शक्यतो १० मिनिटांचा असतो. त्यानुसार मांडणी केली जाते.

**२.१.उद्घोषणा**

आकाशवाणीवरील बातमीपत्रात सुरुवातीला उद्घोषणा केली जाते. उद्घोषणेत आकाशवाणीचे केंद्र, निवेदकाचे नाव आणि बातमीपत्राचा प्रकार सांगितला जातो. उदा : आकाशवाणी पणजी, चंद्रकांत कोरगावकर प्रादेशिक बातम्या देत आहेत.

**२.२. ठळक बातम्या**

उद्‌घोषणनेनंतर ठळक बातम्या देण्यात येतात. निवेदक स्पष्टपणे ठळक बातम्या असा उल्लेख करतो.

**२.३.सविस्तर बातम्या**

त्यानंतर प्रत्येक ठळक बातम्यांचे सविस्तर विश्लेषण केले जाते. यामध्ये एकामागून एक बातम्या देण्यात येतात. या बातम्यांचा क्रम प्रथम राजकीय, सरकारी निर्णय, सांस्कृतिक, अपघात, गुन्हेगारी असा क्रम ठेवला जातो.

**२.४. पुन्हा उद्‌घोषणा**

पाच मिनिटांनंतर महत्त्वाच्या तीन-चार बातम्या सविस्तर सांगितल्यानंतर पुन्हा उद्‌घोषणा केली जाते. उदा : या प्रादेशिक बातम्या आकाशवाणीच्या पणजी केंद्रावरून देण्यात येत आहेत.

त्यानंतर उरलेल्या बातम्या सांगितल्या जातात.

**२.५ पुन्हा ठळक बातम्या**

बातमीपत्राच्या शेवटी तापमान-पाऊसमान सांगितले जाते. उन्हाळ्यात व हिवाळ्यात तापमान तर पावसाळ्यात पावसाविषयीचा अंदाज व्यक्त केला जातो. शेवटी पुन्हा ठळक बातम्या सांगितल्या जातात.

**३. आकाशवाणीवरील बातमीलेखनासाठीची पथ्ये**

१.आकाशवाणीवरील बातमीसाठी सर्वांना समजेल अशी भाषा वापरावी.

२.आकाशवाणीवरील बातमीमध्ये साहित्यप्रचूर व बोजड शब्दांना फाटा द्‌यावा लागतो.

३.आकाशवाणीवरील बातमीलेखनासाठी बोली भाषेचा वापर करावा लागतो.

४.शब्दयोजना विशिष्ट पद्‌धतीने करावी लागते. उदा : दिले, केले, सांगितले ऐवजी दिलं, केलं, सांगितलं अशी क्रियापदाची रूपे वापरावी लागतात.

५.५.व, नि या उभयान्वयी अव्ययाऐवजी आणि या उभायन्वयी अव्ययाचा वापर करावा लागतो.

६. श्रोत्यांना गोंधळात टाकणारी आकडेवारी सांगू नये. उदा : ४,३२,४४० असे म्हणण्याऐवजी चार लाख बत्तीस हजार चारशे चाळीस अशी आकडेवारी सांगावी.

७. २.५., ४.५ असे म्हणण्याऐवजी अडीच, साडेचार असे शब्दप्रयोग करावेत.

८.वाक्यरचना ही साधी, सोपी व लहान असावी. उदा : आजच्या ठळक बातम्या , पंतप्रधान इंग्लंडला रवाना

९.खास,आम,डॉ. प्रा, असे न म्हणता खासदार, आमदार, डॉक्टर, प्राध्यापक असा सरळ उल्लेख करावा.

**४.समारोप**

आकाशवाणी हे सर्वांत प्रभावी आणि गतिशील माध्यम आहे. साक्षर आणि निरक्षर अशा दोन्ही वर्गासाठी उपयुक्त माध्यम म्हणून आकाशवाणीचा विचार करता येतो. आकाशवाणीवरील बातमीपत्राचे प्रादेशिक, राज्यस्तरीय, राष्ट्रीय असे प्रकार पडतात.आकाशवाणीवरील बातमीपत्राचा विशिष्ट आकृतीबंध असतो. आकाशवाणीवरील बातमीपत्रात वापरली जाणारी भाषा ही बोलीभाषेच्या वळणाची असते.